दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक ३४५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.१० मार्च २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com


सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजयकुमार मुखर्जी ह्यांस प्रकल्पग्रस्त समितीचे अध्यक्ष व शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार बबनदादा पाटील व कामगार नेते महेंद्र घरत ह्यांनी दिल्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा...

# शिवभोजन चालकांचा जीएसटी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून वसूल करावा

**भाग २**

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यात शिवभोजन चालकांना केंद्र शासनाने जीएसटी नंबर घेण्याची सक्ती केली. त्यामुळे गरिबांची सेवा करणे हे ब्रीद वाक्य उचलेल्या शिवभोजन चालकांनी, राज्य शासनाने गरिबांसाठी अंमलात आणलेली शिवभोजन योजना चालू ठेवण्यासाठी केंद्र शासनाचा जीएसटी क्रमांक घेतला. परंतु जीएसटी क्रमांक घेतल्यावर संबंधिताला (ग्राहकाला) त्यापोटी होणार ५% जीएसटी हा शासनाच्या तिजोरीत जमा करणे जरुरीचे आहे. परंतु जिल्हा पुरवठा शाखेतील अधिकारी व कर्मचारी (त्या विभागातील) हे कामचुकार आहेत असा आरोप जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी यापूर्वीच केला आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील १०७ शिवभोजन केंद्र चालकांना गेले सहा महिन्यांपासून बिले मिळालेली नाहीत. अशाही परिस्थितीत गरिबांची सेवा करण्यासाठी शिवभोजन चालकांनी आपले कर्तव्य सुरू ठेवले आहे. परंतु केंद्र शासनाचा जीएसटी जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या चुकीच्या नियोजनामुळे बिले न मिळाल्यामुळे त्याला जबाबदार जिल्हा पुरवठा अधिकारी हे व शिवभोजन विभागातील कर्मचारी हे आहेत. म्हणून त्यांच्या पगारातून शिवभोजन चालकांची बिले राज्य शासनाने अदा करावीत अशी मागणी शिवभोजन चालकांकडून केली जात आहे.



जिल्हा पुरवठा अधिकारी हे खोटी आश्वासने देण्यात तरबेज असून शिवभोजन चालकांना गेले सहा महिने बिले मिळाली नसताना केवळ कोरोनाचा बाहू करून रायगड जिल्ह्यातील १०७ शिवभोजन केंद्र चालकांच्या बैठकीत आपल्या कार्यालयातील व ट्रेझरी कार्यालयातील कर्मचारी हे ८ महिन्यापूर्वी कोरोनाने ग्रासले होते त्यामुळे बिलाला विलंब झाला अशी कबुलीही त्यांनी शिवभोजन चालकांच्या बैठकीत दिली व आपण १० मार्च पर्यंत सर्व शिवभोजन चालकांची बिले अदा करण्यासाठी कटीबद्ध आहोत असे आश्वासन त्या बैठकीत दिले होते. त्यापूर्वी बिलाबाबत दैनिक रायगड नगरीचे संपादक सुनील पोतदार हे व रास्त धान्य दुकान वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष भरत पाटील हे जिल्हा पुरवठा अधिकारी बोडके यांना भेटले असता येत्या ८ दिवसात बिले पूर्ण करण्याचे आश्वासनही त्यावेळी दिले होते. परंतु एकही आश्वासन त्यांनी पाळले नाही. त्यामुळे खोटी आश्वासने देण्यात ते तरबेज असावेत असा मतप्रवाह निर्माण झाला आहे. त्याचबरोबर केंद्र शासनाने शिवभोजन केंद्रांना जीएसटी लावल्यावर त्या जीएसटीची बिले बिल दिल्यावर किमान ५ दिवसात केंद्र चालकांना मिळणे जरुरीचे आहे. अन्यथा चालकांना केंद्र शासनाचा जीएसटी दंड आकारला जातो. म्हणून त्या दंडाची रक्कम जिल्हा पुरवठा अधिकारी आणि त्या विभागातील काम करणारे कर्मचारी यांच्या पगारातून शासनाने कापून घेऊन तो केंद्र चालकांच्या खात्यात जमा करावा अशी मागणी रायगड जिल्ह्यातील शिवभोजन चालकांकडून केली जात आहे.

भाग-३ उद्याच्या अंकात

## संक्षिप्त...

### राज्यात आज १२ हजारांवर रुग्ण करोनामुक्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात करोनावर मात करणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत असून आज तब्बल १२ हजार १८२ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत. दिवसभरात ९ हजार ९२७ नवीन रुग्णांची भर पडली असून आज राज्यात ५६ करोनामृत्यूंची नोंद झाली आहे. दरम्यान, राज्यात सध्या करोनाचे ९५ हजार ३२२ ॲक्टिव्ह रुग्ण असून सलग दोन दिवस नवीन बाधितांपेक्षा बरे होणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने हा मोठा दिलासा मानला जात आहे. राज्यातील अनेक शहरांत करोनाचा विळखा पुन्हा घट्ट होताना दिसत आहे. त्यामुळे जनता कर्फ्यू, अंशत: लॉकडाऊन, नाइट कर्फ्यू व अन्य कठोर निर्बंध स्थानिक पातळीवर लागू करण्यात येत आहे. या स्थितीत गेले दोन दिवस करोनामुक्त रुग्णांचे प्रमाण वाढत असल्याचे दिलासादायक चित्र आहे. राज्याची आजची आकडेवारी पाहिल्यास आज ५६ करोना बाधित रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाली असून मृतांचा एकूण आकडा आता ५२ हजार ५५६ इतका झाला आहे.

# श्रीवर्धन क्रीडा संकुल रखडले

## क्रीडा संकुल दोन महिन्यात पूर्ण होणारे आश्वासन हवेतच विरले

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्याचे बोर्लीपंचतन येथील क्रीडा संकुल येत्या दोन महिन्यात पूर्ण करणार असे नेहमीच सांगण्यात येते. मात्र, डिसेंबर नंतर हि दोन महिने उलटून गेले तरी कोणत्याही प्रकारचे कामे सुरु झाली नसल्याचे समोर आले आहे.

श्रीवर्धन च्या क्रीडा संकुलाचे ३ मे २०१३ रोजी भूमिपूजन करण्यात आले व २०१४ साली प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. या कामाचे कंत्राट श्रीवर्धन मधील सिरोया कन्स्ट्रक्शन कंपनी ला देण्यात आला आहे. क्रीडा खात्यामार्फत सार्वजनिक बांधकाम खात्याकडे टप्याटप्याने आजपर्यंत ५५ लाख रूपये



वर्ग झाले आहेत. मागील वर्षभर क्रीडा संकूलाचे काम बंद आहे. भूमिपुजनानंतर काम ६ वर्षे सुरू असल्याने ठेकेदाराचे अन्य ठिकाणी काम चालू असल्याने येथील कामाकडे ठेकेदार दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांचे कंत्राटदाराशी आर्थिक हितसंबंध तर नाही ना असं प्रश्न उपस्थित केले जात आहे. गेली सात वर्षांपासून श्रीवर्धन मधील क्रीडा संकुलचे काम सुरु आहे. मात्र, अद्यापही पूर्ण होऊ शकले नाही. हे काम पुर्णत्वास केव्हा जाणार असा प्रश्न परीसरातील क्रीडा प्रेमींना पडला आहे. ठेकेदारास सार्वजनिक बांधकाम खाते पाठीशी घालत असल्याची चर्चा क्रीडा प्रेमींमध्ये आहे.

### म्हणे एक कोटी जमा आहेत

श्रीवर्धन येथील सार्वजनिक बांधकाम खात्याचे उपअभियंता श्रीकांत गणगणे यांच्या याबाबत बोलले असता क्रीडा संकुल साठी १ कोटी आल्याचे सांगितले मात्र कामे अद्यापही का सुरु झाली नाहीत हे विचारले असता करू, बघू असे बोलत कोणतीही ठोस प्रतिक्रिया दिली नाही.

### मंत्र्यांची पाठ अधिकारी सुसाट

मंत्री आले कि त्यांच्या भोवती वही घेऊन फिरण्याची अधिकाऱ्यांची जुनी पद्धत. बैठकीत काही नोंदी टिपून घेणे आणि बैठक संपल्यावर मात्र, अधिकारी त्याकडे 'वेळे'नुसार आणि 'निधी'नुसार लक्ष देतात हे आता जगजाहीर आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अधिकाऱ्यांनी असेच केले असावे असे बोलले जाते.

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कुस्ती स्पर्धेत**

# पै. रूपेश पावशे यांनी अजिंक्यपद पटकावून जिंकली मानाची चांदीची गदा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त स्व. ह. भ. प. वासुदेव गोपाळ शेळके व स्व. डॉ. बुधाजी सहदेव शेळके यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेत पैलवान रूपेश शिवराम पावशे यांनी अजिंक्यपद पटकावून मानाची चांदीची गदा जिंकली. त्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पै. रुपेश पावशे यांचे अभिनंदन केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, पालीदेवद ग्रामपंचायत उपसरपंच अशोक पाटील, राजेश पाटील, आदी उपस्थित होते.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा यंदा ७० वा वाढदिवस असून त्यानिमित्ताने विविध समाजोपयोगी उपक्रमे आयोजित करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने पालीखुर्द येथे स्व. ह. भ. प. वासुदेव गोपाळ शेळके व स्व. डॉ. बुधाजी सहदेव शेळके यांच्या स्मरणार्थ जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत पै. रुपेश पावशे यांनी खुल्या गटातील स्पर्धेत खोपोलीच्या पैलवानला नमवून अजिंक्यपद 'किताब पटकाविले, तसेच त्यांनी कुस्ती आखाड्यातून निवृत्ती जाहीर केली. गेली २० वर्षे रुपेश पावशे यांनी कुस्ती खेळून अनेक स्पर्धा जिंकल्या तसेच राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवले. त्यामुळे आता स्वतः स्पर्धेत न खेळता यापुढेही कुस्तीपट्टू तयार करण्याचे काम करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.



# भाजपा नेते गणेश पाटील यांचा शेकापत जाहीर प्रवेश



पनवेल नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष, भाजपा नेते गणेश पाटील यांनी त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांसह शेतकरी कामगार पक्षात जाहीर प्रवेश केला. गणेश पाटील यांच्या पत्नी या पनवेल महापालिकेत विद्यमान नगरसेविका आहेत. या पक्षप्रवेशावेळी मा.आ.धैर्यशिल पाटील, मा.नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, शेकाप नेते काशिनाथ पाटील, नारायणशेठ घरत, नगरसेवक गणेश कडू व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# उघड्यावरील मच्छी मार्केटमुळे महिलांना सोसावे लागतात उन्हाचे चटके



**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण चारफाटा येथील मच्छी मार्केट वरील जागेत मच्छी विक्रीत्या महिलांसाठी चाणजे ग्रुप ग्रामपंचायत किंवा सिडकोने आजतागायत कोणत्याही प्रकारची निवारा शेड किंवा सुसज्ञ असे मच्छी मार्केट उभारण्यासाठी पुढाकार न घेतल्याने मच्छी विक्रीत्या महिलांना उन्हाचे चटके सहन करावे लागत आहे.तरी सदर मच्छी मार्केटवर निवारा शेड उभारण्यासाठी सिडको आणि स्थानिक ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस दिनेश म्हात्रे यांनी केली आहे.

उरण तसेच चाणजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील कोळी, आगरी,कराडी समाजाच्या अनेक महिला या आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी उरण शहराच्या प्रवेशद्वारांजवळील चार फाटा येथील जागेत गेली अनेक वर्षे मासे विक्रीचा व्यवसाय करत आहेत.परंतु सिडको आणि स्थानिक ग्रामपंचायतीने या परिसरातील नाल्याच्या कामासाठी मागील वर्षी मच्छी विक्रीत्या महिलांच्या डोक्यावरील असणारे पत्र्यांच निवारा शेड काढून टाकण्याचे काम हाती घेतले.त्यानंतर आजतागायत पुन्हा सुसज्ञ असे मच्छी मार्केट किंवा पत्र्यांच निवारा शेड उभारण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत किंवा सिडकोने पुढाकार न घेतल्याने सध्या उन्हाचे चटके सहन करीत मच्छी विक्रीत्या महिलांना आपला व्यवसाय सुरू करण्याची वेळ आली आहे.

प्रखर अशा उन्हामुळे सदर महिलांना शारीरिक आजारा बरोबर व्याधींचा ही सामना करावा लागत आहे त्यामूळे सदर मच्छी विक्रीत्या महिलांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. ..../२

# महिला दिनानिमित्त महिला ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका व पनवेल तालुका महिला आघाडी जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था, पनवेल यांच्यातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त नवनिर्वाचित महिला ग्रामपंचायत सदस्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. याचे उद्घाटन पनवेल विधानसभा अध्यक्ष काशीनाथ पाटील यांनी केले. यावेळी त्यांनी महिला दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.



सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा योगिता पारधी यांनी जिल्हा परिषदेच्या महिलांच्या विविध योजना आणि त्या कशा राबवल्या जातात, याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रमुख पाहुणे म्हणून ममता म्हात्रे यांनी कोव्हिडमध्ये काम केलेल्या आशा वर्कर्सच्या कामाचे विशेष कौतुक केले. यावेळी व्यासपीठावर माधुरी गोसावी, नगरसेविका सारिका भगत, नगरसेविका प्रज्योति म्हात्रे, राजेश्री मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमात नगरसेविका सुरेखा मोहकर यांनी आपल्या मनोगतात महिलांचे अधिकार त्यांचे हक्क या बाबात विस्तृत माहिती दिली.

# पोलादपूर तालुक्यातील सह्याद्रीरांगावर दिवसरात्र वणवा पेटलाय!

## वणवाविरोधी पथके न नेमल्याने यंदा जैवविधतेची प्रचंड हानी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील ग्रामीण भागातील सह्याद्रीच्या डोंगररांगावर वणव्यामुळे रात्री आकर्षक रोषणाई झाल्याचे दृश्य गेल्या आठवडाभरापासून सर्वत्र दिसू लागले असून यामुळे प्रचंड तापमान वाढ झाली आहे. दरवर्षी होलिकोत्सवानंतर उन्हाळ्याच्या झळा बसण्याचा अनुभव घेणाऱ्या पोलादपूरकरांना यंदा मात्र होलिकोत्सवापूर्वीच महिनाभर आधीप-ासून उन्हाचे चटके सोसावे लागत आहेत. दरवर्षी वनजमिनी तसेच डोंगर-उतारांवरून आगीच्या ज्वाळांनी वेढत





जाणाऱ्या वणव्यांवर प्रतिबंध करण्यासाठी तालुक्यातील वनविभागाने कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना केल्या नसल्याने यंदा वणव्यांसोबत जैवविधतेची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे.

पोलादपूर तालुक्यातील वझरवाडी ते चरई, महादेवाचा डोंगर आणि तेथून रेडेखाचर, रानवडी, घागरकोंड, बोरावळे रस्त्यालगत दुतर्फा वणव्याने रान पेटू लागले आहे. दरवर्षी ..../२

# उत्तम कुटूंब व्यवस्थेतून होते चांगल्या समाजाची जडण-घडण : विभा इंगळे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उत्तम कुटुंबातूनच चांगला समाज घडतो. ती जबाबदारी आई–वडिलांची आहे, म्हणजेच त्याचे मूळ कुटुंब व्यवस्थेमध्ये आहे, त्यातूनच समाजाची चांगल्या प्रकारे जडण–घडण होऊ शकेल, असे मत येथील जिल्हा न्यायालयाच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती विभा इंगळे यांनी काल (दि.८ मार्च) येथे व्यक्त केले.



जिल्हा प्रशासनातर्फे काल (दि.८ मार्च) जागतिक महिला दिनानिमित्त जिल्हा नियोजन भवन सभागृहात महिलांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी महाडच्या नगराध्यक्षा स्नेहल जगताप, जिल्हाधिकारी निधी चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी पद्मश्री बैनाडे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख चारुशीला चव्हाण, उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, अलिबागच्या प्रांत अधिकारी शारदा पोवार आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

कुटुंबव्यवस्थेचे महत्व अधोरेखित करताना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा इंगळे पुढे म्हणाल्या की, आजच्या बदलत्या परिस्थितीत वैयक्तिक आणि सामाजिक सुरक्षाही चिंतेची बाब आहे. शिक्षण,पैसा यापेक्षाही मानवी मूल्ये महत्वाची आहेत. ही मूल्ये प्रत्येक कुटुंबातून मुलींसह मुलांनाही शिकविणे, ही काळाची गरज आहे. आजची पिढी चांगली घडली तरच भविष्यातील समाज चांगला असणार आहे. त्यामुळे आपल्या मुलांवर आपण काय संस्कार करतो? ही नैतिक जबाबदारी आई–वडिलांवर आहे, यातूनच कौटुंबिक आणि सामाजिक सुरक्षितता निर्माण होणार आहे. पुरुषांनी स्त्रियांकडे बघण्याची दृष्टी बदलणे आवश्यक असून त्यांनी स्त्रियांप्रती समभावना स्वीकारायला हवी, तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून प्रत्येक लहान मुलां–मुलींना स्वयंसुरक्षेची तंत्रे शिकवली पाहिजेत. त्याकरिता पालकांनी सतत सजग असणे आवश्यक असल्याचेही प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा इंगळे म्हणाल्या.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जिल्हा प्रशास–नाचा गाडा हाकणाऱ्या महिला अधिकाऱ्यांचे उत्स्फूर्तपणे कौतुक केले. बदललेल्या सामाजिक परिस्थितीवर परखड भाष्य करताना त्यांनीआपल्या भाषणातून महिलांवर अत्याचाराच्या वाढत्या घटनांकडेही लक्ष वेधले. कुटुंबातून आजच्या पिढीला योग्य संस्कार मिळाले, घरातील मुलाला आणि मुलीलाही समसमान वागणूक, संस्कार, विश्वास आणि बळ मिळाले तर हे चित्र नक्कीच बदलेल, असा विश्वास जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी यावेळी व्यक्त केला. त्याचबरोबर त्यांनी महिला प्रत्येक क्षेत्रात सक्षमपणे काम करीत यशस्वी होत असल्याची अनेक उदाहरणांमधून दिली. कोविडविषयी सर्व नियमांचे काटेकोर पालन करीत अत्यंत शिस्तबध्द पद्धतीने झालेल्या या कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध क्षेत्रात आ–पले कर्तृत्व गाजविणाऱ्या महिलांना सन्मानपत्र, तुळशीचे रोप, पुष्प देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला उपस्थित सर्व महिलांच्या हातावर मेहंदी काढून हा महिला दिन वेगळया पध्दतीने साजरा करण्यात आला.

याप्रसंगी महिला मतदार नोंदणी अधिकारी म्हणून उत्तम काम केलेल्या कर्जत उपविभागीय अधिकारी श्रीमती वैशाली परदेशी, उपजिल्हाधिकारी अश्विनी पाटील, अलिबाग उपविभागीय अधिकारी शारदा पोवार, महाड उपविभागीय अधिकारी श्रीमती प्रतिमा पुदलव–ाड, महिला सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी म्हणून उत्तम काम केलेल्या पेण तहसिलदार डॉ.अरुणा जाधव, रोहा तहसिलदार श्रीमती कविता जाधव, माणगाव तहसिलदार श्रीमती प्रियंका कांबळे, पोलादपूर तहसिलदार श्रीमती दिप्ती देसाई, उत्कृष्ट महिला मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून काम केलेल्या आशा वर्कर श्रीमती अक्षता पाटील, प्रतिक्षा म्हात्रे, अंगणवाडी सेविका ज्योती पाटील, नगरपालिका कर्मचारी कविता चर्जन, पोलीस पाटील श्रीमती प्राजक्ता पाटील, उत्कृष्ट निवडणूक साक्षरता क्लब म्हणून कोकण एज्युकेशन जा.र.ह.कन्या शाळा, अलिबाग, पी.एन.पी.एज्युकेशन सोसायटी आर्टस, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालय, वेश्वी अलिबाग, उत्कृष्ट सामाजिक संस्था म्हणून प्रिझम सामाजिक संस्था, महिला आयकॉन म्हणून तपस्वी नंदकुमार गोंधळी, महिला पत्रकार म्हणून शारदा धुळप (निवृत्त,दै. सामना), सुवर्णा दिवेकर(दै.पुढारी), प्रमिला जोशी (दै.महानगर), सारिका पाटील (दै. रायगड नगरी), श्वेता जाधव (दै.रायगड टाईम्स, अलिबाग) या महिलांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

# आर्या वनौषधी तर्फे विविध कार्यक्रम नारी शक्तीचा गौरव



**दै.रायगड नगरी । पनवेल**

जागतिक महिला दिनानिमित्त आर्या वनौषधी संस्थेंच्यावतीने पनवेल, पालघर येथे वृक्ष वाटप, वृक्ष रोपण, वृक्षांचा वाढदिवस आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा गौरव करण्यात आला.

सदर कार्यक्रमातस जेष्ठ पत्रकार संजय कदम, आर्या प्रहरचे पालघर जिल्हा प्रतिनिधी राजेश संखे , अतुल वझे, मुकेश सिंह, अमेय पिंपळे, संतोष कोरे, जितेंद्र सावे, हरेश जळे, विलास घरत,विक्रम येवले, नितीन जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील यांनी महिलांसाठी उपयुक्त अशा रिठा, धायटी,सीतेचा अशोक, कांचनार ,शतावरी आदी औषधी वनस्पतींची सखोल माहिती दिली. या आगळ्या वेगवेगळ्या कार्यक्रमांस महिलांचा उदंड प्रतिसाद लाभला. या वेळी मेघना संजय कदम, मानसी जामकर, नलिनी तटकरे, मनाली म्हात्रे, शकुंतला म्हात्रे आदी महिलांना सीतेचा अशोक, ब्राम्ही, गुडमार,कडू चिरायता, दमवेल, अश्वगंधा, शतावरी आदी औषधी रोपे वाटप करण्यात आली. महिला दिनाचे औचित्य साधून आर्या वनौषधी संस्थेच्यावतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मौसमी तटकरे, प्रियांका पाटील आदी महिलांना या वेळी सन्मानचिन्ह देवून गौरविण्यात आले. नेरे येथील स्नेहकुंज आधारगृहात संगीता नितीन जोशी यांच्या हस्ते सीतेचा अशोक या वृक्षाचे रोपण करण्यात आले.

# जांभूळपाडा येथे जाळ्यात अडकलेल्या भेकराची वन्यप्रेमींकडून सुटका



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जांभूळपाडा गावाच्या परिसरात सायंकाळच्या सुमारास जंगलाकडून मानवी वस्तीकडे येत असलेले लहानसे भेकर आढळून आले. मात्र गावातील भटक्या कुत्र्यांच्या हल्यापासून वाचण्यासाठी भेकर तेथे असलेल्या शेतमळ्या भोवताली आपला जीव वाचविण्यासाठी अटोकिचे प्रयत्न करत होते. भेकर अतिशय घाबरून गेल्याने ते मोठ – मोठयाने ओरडू लागले. या भेकराचा ओरडण्याचा आवाज येथील सामाजिक कार्यकर्ते दशरथ पाटील यांनी ऐकताच त्यांनी आवाजावरून शेतमळ्यातील जाळ्यात अडकलेल्या भेकरचा शोध घेतला असता,काही अवधीतच त्याचे घडले.

मात्र त्याला सुखरूप बाहेर काढण्यासाठी येथील प्राणीमित्र आणि काही व्यक्तींची आवश्यकता असल्याने दशरथ पाटील यांनी जांभुळपाडा ग्रामस्थांना पाचारण करून तात्काळ या भेकर प्राण्याच्या संरक्षणासाठी चिर्ले येथील निसर्ग व प्राणी प्रेमी आनंद मढवी व वनपाल डी. डी. पाटील, वनरक्षक मेजर सुदास धांडे, मेजर किरण देवकर, यांनाही पाचारण केले. प्राणी मित्र आनंद यांनी वन्य प्रेमिन्रा अजिंक्य पाटील, विक्रांत मोहिते, सुमित घरत, अल्पेश पाटील, राजेश पाटील व जांभुळपाडा क्रिकेट टीमचे सभासद या सर्वांची मदत घेऊन या लहानशा भेकरास जाळ्यातून कोणतीही दुखापत न करता अलगद बाहेर काढले.

उरण तालुक्यातील वनरक्षकांच्या उपस्थितीत सुरक्षित रित्या बाजूच्या डामखांडी जंगलात या भेकरास संचार करण्यासाठी सोडण्यात आले. यावेळी सदर भेकराने त्याला जंगलात सोडल्याने सुटकेचा निश्वास सोडला.या जांभुळपाडा येथील वनक्षेत्र परिसरात वन्यजीवांची भटकंती सुरूच असते. त्यामुळे वन्यजीवांच्या शिकारीवरही वन विभागाचे लक्ष आहे. या प्राण्यांच्या संरक्षणासाठी येथील निसर्ग व प्राणीप्रेमींचे नियमित लक्ष असून,वन्यजीवांच्या संरक्षणासाठी नियमित पुढाकार घेत आहेत.

# पेणमध्ये पाच गुटखा विक्रेत्यांवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण शहर व तालुक्यात अन्न व औषध प्रशासन विभागा मार्फत गुटखा विक्रेत्यांवर धडक मोहीम राबविण्यात आली. यामध्ये पेण शहरातील चार व तालुक्यातील एका गुटखा विक्रेत्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र मुख्य गुटखा किंग असणारे गुड्डू नामक अजूनही मोकाट फिरत आहेत.

पेण शहरात व तालुक्यात मागील अनेक महिन्यांपासून गुटखा विक्री जोरात सुरू आहे. शहरातील प्रत्येक पानटपरीवर बंदी घालण्यात आलेला गुटखा राजरोसपणे विकला जात आहे. सोमवारी अन्न व औषध प्रशासनाच्या वतीने धडक मोहीम राबवून पेण शहरातील म्हाडा कॉलनी येथील जय गणेश जनरल स्टोअरचे जगन्नाथ पांडुरंग म्हात्रे, गांधी मंदिर समोर अनमोल पान शॉपचे एजाज इब्राहीम कागदी, एस.टी.स्टँड जवळील आराध्या पान शॉपचे शंकर सखाराम पाटील, नंदीमाळनाका येथील अक्षय स्नॅक्स कॉर्नरचे नंदकुमार विठ्ठल चव्हाण याबरोबरच मुंबई–गोवा महामार्गावरील ईरवाडी येथील रायगड पॅलेस हॉटेल येथील नौशाद आलम झाकीर हुसेन यांच्या पान स्टॉल अशा पाच दुकानातून तीन हजार ५५७ रुपयांचा तंबाखू मिश्रित पान मसाला जप्त करण्यात येऊन या दुकानांना सील लावण्यात आले आहे.गुटखा विक्रेत्यांवर पेण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत अन्न प्रशासनाचे आयुक्त एल.ए.दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी भांडारकर, एस.आर.आढाव, वि.वि.शिंदे, वीर, आर.ए.समुद्रे यांनी सहभाग घेतला. अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईचे नागरिकांकडून कौतुक केले जात आहे.


Adv.Vinita Karki
Priyanka Patil

## PUBLISH NOTICE

IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE JUNIOR DIVISION, CBD BELAPUR, AT VASHI

M.A. 203 Of 2021
Exh no. 6
Next Date : 16/04/2021

Shri.Amol Maruti Jamdar
Age: 37 years, occ: service
Having address at Flat no. 705, B wing,
Mulund Mangaldeep CHS Ltd,
Mithagar Road, Mulund East,
Mumbai 400081. Applicant

V/s

1) Smt.Phulabai Maruti Jamdar
Age: 63 years, Occ:Housewife
Residing at 705, B wing,
Mulund Mangaldeep CHS, Mitaghar Road,
Mulund East, Mumbai 400081
2) Mrs. Rekha Deepak Shelar
Age: 45 years, Occ: homemaker
Residing at: 1st floor, Koteswar Darshan,
Tamjai Nagar, Satara-415001
3) Mrs. Usha Prakash Ingle
Age: 42 years, Occ: homemaker
Residing 503, B wing, Saifee Park, opp.
Old Post Office, Mazgaon, Mumbai 400010
4) Mrs. Amruta Parag Yadav
Age: 33 years, Occ: Advocate
Residing at 201, A wing, Sanghamitra CHS,
Swami Nityanand Marg,
Panvel, Raigad 410206 Opponents

The above Applicant has filed the Application for getting Heirship Certificate with respect to the immovable properties left over by Shri.Maruti Laxman Jamdar who died on 09/07/2020 at Mulund. The immovable properties are as below.

1. Residential premises bearing no. Flat no. G-1, Ground Floor, Dattakrupa Co-operative Housing Society Ltd., Sector 11, Plot no. 66, Kharghar, Raigad, 410210, admeasuring about 53.46 sq. mtrs (built-up Area), which is more particularly described in the Schedule "A" here-under written

**Value of Flat No-G-1 A wing 53.46, sq. mtrs (built-up Area). Rs. 3,80,000.00/-**

2. Residential premises bearing Room no. AL-1, Satyam Apartment, Sector 16, Plot no. 14, Airoli, Navi Mumbai- 400708, admeasuring about 16.09 sq. mt.

**Value of Room no. AL-1 (16.Q9 sq. mt.). Rs. 1,50.000.00/-**

If at all any person has any objection against the issue of the Heirship Certificate in favour of the Applicant, then within a period of 30 days from the date of publication, of the notice the said objection may be submitted in the Hon'ble Court in writing. Within the above period if any objection does not come in the name of the applicants and the objection coming on letter will not be entertained.

Today on this 8 th day of March 2021 the notice is giving with my signature and the seal of the court.

Court Seal

Sd/-
Asst.Superintendent
Court (J.D.) Vashi



## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**



दैनिक रायगड नगरी

जाहिरातीचे उत्तम

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'

For Booking....

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434

Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, विक्री करारनामा–स्पेस लॅण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर कलवे हैदर बाबरअली आणि श्री.खीमसिंह मांगुसिंह कडेचा यांचा नोंदणी क्रमांक ६८०३/२०१३, दि.०९/१०/२०१३, मालमत्ता : मौजे वंजारपाडा, ता.कर्जत, जि.रायगड येथील स.नं.१५, हि.नं.२, क्षेत्र १–३२–० हे.आर.पॉ., आकार ११.३४ रु.पै. या मिळकतीवर बांधण्यात आलेली फेज नं.१ मधील साई मोरेश्वर कॉम्प्लेक्स मधील बिल्डींग नं.१ मधील पहिल्या मजल्यावरील ब्लॉक नं.१०३ यांचे कारपेट ४२० चौ.फूट अशा मिळकतीचा विक्री करारनामा हे दस्त श्री.खीमसिंह मांगुसिंह कडेचा कडून हरवलेले आहे आणि भेटत नाही. त्यासंदर्भात कामोठे पोलीस ठाण्यात गहाळ रजिस्टर नोंद क्र.९४९/२०२०, दि.१०/१०/२०२० नोंद केलेली आहे. वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत भेटावे. श्री.खीमसिंह मांगुसिंह कडेचा, शॉप नं.२३, प्लॉट नं.७३, ७५, वैकुंठ सोसायटी, सेक्टर १९, कामोठे, कळंबोली नोड, पनवेल, रायगड किंवा ॲड.प्रिया मोरे ऑफिस–सी ००१, सिंहगड सोसायटी, प्लॉट नं.३ अ, सेक्टर ७, कामोठे, पनवेल, रायगड ४१०२०९

**सही/–**
**ॲड.प्रिया मोरे**
**ऑफिस–सी ००१, सिंहगड सोसायटी,**
**प्लॉट नं.३ अ, सेक्टर ७, कामोठे,**
**पनवेल, रायगड ४१०२०९**
**मो.नं.९००४३२९९७९**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतींचे मुळ मालक श्री.वैभव एकनाथ दुधे यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविलेले आहे. सदर जमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे :–

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : रिस, ता.खालापूर, जि.रायगड**

| सर्व्हे नं./ हिस्सा नं. | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| ६७/० | ७६.३०.०० | ७६३ | श्री.वैभव एकनाथ दुधे |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

खालापूर
दि.०९/०३/०२१

**सही/–**
**ॲड.सागर का.कोंडीलकर**
**ऑफिस नं.२, समर्थ शिवराम मार्केट**
**मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड**
**मो.नं.८७९६८७७३६९**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## महिलांना सोचावे लागतात उन्हाचे चटके

तरी सदर मच्छी मार्केटवर निवारा शेड उभारण्यासाठी स्थानिक चाणजे ग्रुप ग्रामपंचायत व सिडकोने पुढाकार घ्यावा अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस दिनेश म्हात्रे यांनी केली आहे.

यासंदर्भात कोळी समाजाचे महाराष्ट्र राज्याचे नेते मार्तंड नाखवा यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की सिडकोने सदर जागेवर सुसज्ञ असे मच्छी मार्केट उभारण्यासाठी पुढाकार घ्यावा ही आमची कोळी समाजाची मागणी आहे.ततपुर्वी पार्थदादा पवार यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सदर मच्छी मार्केटच्या निवारा शेड साठी सिमेंटचे पत्रे उपलब्ध करून देण्याचे काम दातूत्वाच्या भावनेतून हाती घेतले होते.

## सह्याद्रीरांगावर दिवसरात्र वणवा पेटलाय!

होलिकोत्सवापूर्वी रात्रीच्यावेळी हवेत गारवा अनुभवणाऱ्या ग्रामीण भागात या वणव्यामुळे प्रचंड उष्मा जाणवत आहे. रविवारी दुपारनंतर सुरू झालेल्या वणव्याने गेल्या अठ्ठेचाळीस तासांमध्ये वणव्याच्या आगीच्या ज्वाळांनी हजारो हेक्टर वनजमिनीमध्ये थैमान घालण्यास सुरू केली आहे. पोलादपूर तालुक्यातील वनजमिनीमध्ये खैर, काजू, करवंद, तोरणं, आळू, रायवळी आंबा, साग, बाभळी तसेच विविध लहान–मोठे दूर्मिळ पक्षी, सरपटणारे प्राणी, रानडुक्करं, भेकरं, साळींदर, ससे, मोर, लांडोर यांचे वास्तव्य मोठ्या संख्येने आहे. काही वनस्पती आणि वनौषधींची नैसर्गिक उपज होण्यासाठी तालुक्यातील वातावरण उपयुक्त आहे.

पोलादपूर तालुक्यात मुबलक असलेल्या गवताचा वापर करून पशूखाद्यासह पुठ्ठे व कोरूगेटेड बॉक्सची निर्मिती करण्यासाठी आवश्यक लगदा या गवतापासून तयार करण्याचे कृषीपूरक उद्योग शक्य असूनही त्यादृष्टीने कोणतेही प्रयत्न होत नसल्याने दरवर्षी हजारो टन वणव्यामुळे जळून खाक होत आहे. यासोबतच आता लोकवस्तीकडे आणि शेतीवाडीकडे वणव्याच्या आगीचे लोट पसरून गेल्या काही वर्षांपासून घरे, गुरे आणि गुरांचे वाडेदेखील आगीच्या भक्ष्यस्थानी पडू लागल्याच्या दूर्दैवी घटना सातत्याने घडू लागल्या आहेत. मात्र, या सर्व नुकसानग्रस्तांना कितपत सरकारी मदतीचे सहकार्य मिळाले, याबाबतची आकडेवारी सरकारमार्फत अद्याप जाहिर न झाल्याने वणव्यांपासूनच्या या नुकसानीच्या घटनांना नैसर्गिक आपत्ती गृहित धरले जात नसल्याची बाबही दूर्दैवी मानावी लागणार आहे.

पोलादपूर तालुक्यातील वनविभागाने वणवाविरोधी पथकांची निर्मिती करून रात्री अपरात्री लोकवस्तीसह वनजमिनीकडे जाणारा वणवा रोखण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांमध्ये अशी रचना केवळ कागदावर केली जात असून अचानक उदभवणाऱ्या परिस्थितीत काहीवेळी सर्व काही वणव्याच्या भक्ष्यस्थानी पडल्यानंतर महाड औद्योगिक वसाहतीमधून अथवा महाड नगरपालिकेचा अग्निशमन बंब मागविण्यात येतो. मात्र, तोपर्यंत गुरे, घरे आणि वाड्यांची हानी होते तर जीवसृष्टीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने नागरी वस्तीतील कोणत्याही पंचनाम्यानंतर हानीची भरपाई मिळत नसल्याने अग्निविरोधी तसेच वणवाविरोधी प्रबोधन करण्याची गरज मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# शिवसैनिकांना व समाजाला प्रेरणा देणारे लढवय्ये नेतृत्व अनंत तरे



कोळी समाजाचे नेते अनंत तरे साहेबांचे आकस्मिक निधन झाले. अश्याप्रकारे त्यांच्या निघून जाण्याने मनाला रुखरुख लागली आहे. अशावेळी प्रकर्षांने आठवण होतेय ती सन १९९९ मध्ये तरे साहेबांनी रायगड लोकसभा मतदार संघातून लढविलेल्या निवडणुकीची! त्यांचे लढवय्ये नेतृत्व समाजाला आणि शिवसैनिकांना कायम प्रेरणा देत राहील!!

रायगड लोकसभा मतदार संघ म्हणजे काँग्रेस व शेतकरी कामगार पक्षाची मक्तेदारी तिसऱ्या कुठल्याही पक्षाला शिरकावच नाही. ग्रामपंचायत, जिल्हा परिषदेवर शेकापची असलेली पकड, शिवसेनेसह इतर कुठल्याही राजकीय पक्षाला राजकारणात जणू वावच नव्हता. अशावेळी रायगड लोकसभा निवडणुकीत कोणता उमेदवार द्यावा. हा मोठा यक्ष प्रश्न शिव-सेने समोर होता. रायगड लोकसभा निवडणुकीचा इतिहास पाहता शेकाप व काँग्रेस पक्षा व्यतिरिक्त इतर उमेदवारांना आपले डिपॉझिटही वाचवता आले नव्हते. अशा परिस्थितीत उमेदवारी लढविण्यास शिवसेनेतील अनेक दिग्गज नेत्यांनी आपला नकार कळविला होता आणि अशावेळी शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी निर्णय घेतला, रायगड लोकसभा निवडणुक अनंत तरे लढविणार!!

ठाणे शहराच्या महापौर पदाची हॅट्रिक करणारे विक्रमवीर अनंत तरे बाळासाहेबांच्या या निर्णयामुळे अचंबित झाले. रायगड सारख्या महाकाय मतदार संघात निवडणूक लढविण्यास मी सक्षम आहे का? पण शिवसेना प्रमुख बोलतील ते धोरण व बांधतील तेच तोरण असे मानणारे कटर शिवसैनिक अनंत तरे होते. निवडणूक लढविण्याचा निर्णय तर झाला,पण पुढील वाट बिकट होती. समोर शेकाप चे मजबूत संघटन, माजी मुख्यमंत्री बॅ.अंतुलेंसारखा तुल्यबळ उमेदवार! यात निभाव कसा लागणार ? त्यावेळी रायगड जिल्ह्यात शिवसेनेचे स्थान नगण्य म्हणता येईल असे होते. शेकापची प्रचंड ताकद होती. अनंत तरे यांच्या नेतृत्वाखाली उभी राहिलेल्या महाराष्ट्र कोळी समाज संघाची सभा बोलाविण्यात आली. यावेळी त्यांचे विश्वासू सहकारी रविकांत पेरेकर यांनी तरे साहेब तुम्ही निवडणूक निश्चितपणे लढवा. आम्ही समाजाच्या सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन स्वबळावर तन-मन-धनाने निवडणूक लढवू व एकवीरा देवीच्या आशीर्वादाने निवडणूक जिंकू. असा विश्वास व्यक्त केला, आणि जिल्ह्यातील चाळीस ते पन्नास कार्यकर्ते तन-मन-धनाने कामाला लागले.

रायगड जिल्ह्यात एकूण ११० कोळी वाडे आहेत. या सर्व गावातील प्रचाराचे नियोजन केले. प्रत्येक घरात कसे पोहचायचे याची योजना आखली गेली. अन् कार्यकर्ते जोमाने कामाला लागले. कोळी समाजाला प्रथमच उमेदवारी मिळाली आहे. आपापले पक्ष बाजूला ठेवून आपला उमेदवार लोकसभेत पाठवा. ही प्रचाराची भुमिका घेऊन समाजाचे कार्यकर्ते घरा-घरात पोहोचले. राजकिय पक्षाची बांधिलकी असणारे स्थानिक नेते, कार्यकर्ते देखील या आवाहनाला अनुकूल प्रतिसाद देत होते. जिल्ह्यात काही गावे अशी होती की तिथे शेकाप ची एवढी दहशत होती की शिवसेनेला त्या गावात एन्ट्री नव्हती. समाजाच्या कार्यकर्त्यांनी त्या गावात प्रचार तर केलाच पण त्यामुळे शिवसेनेला त्यामुळे त्या गावामध्ये शिरकाव करता आला.

रायगड लोकसभा मतदार संघात शिवसेनेला अनंत तरे सारखा उमदा उमेदवार मिळाल्याने शिवसैनिकांमध्ये मोठी उमेद निर्माण झाली होती. निवडणूक जोमात पार पडली. कोळी समाजाने तरे साहेबांना भरघोस मते दिली. शेकाप-काँग्रेसला राजकीय पक्षाला अनंत तरेंच्या रुपात सक्षम पर्याय मिळाला होता. बॅ.अंतुले व अनंत तरे यांच्यात अटीतटीची लढत झाली तर शेकाप तिसऱ्या क्रमांकावर गेला. जवळजवळ सव्वा दोन लाख मते मिळवून अनंत तरे यांनी विजयी वाटचाल केली. परंतु फेर मतमोजणी मध्ये बॅ.अंतुलेसाहेब तीन हजार मतांनी विजयी ठरले ! पण समाजाच्या मनात अनंत तरे साहेबांच्या नेतृत्वाचा आदर बळावला !

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी जा-हीरपणे अनंत तरे यांचे कौतुक करताना सांगितले कि, आम्ही निवडणूक हरलो तरी अनंत तरे एका झुंजार शिवसैनिकासारखा लढला. याचा मला अभिमान आहे. आज अनंत तरे आपल्यातून अचानक निघून गेले. त्यांच्या जाण्याने कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली असून ही वेदना जाणवत आहे. पण त्यांच्यातील लढवय्ये नेतृत्व समाजाला आणि शिवसैनिकांना कायम प्रेरणा देत राहील.

**- रविकांत पेरेकर**
**सरसेनापती - शिवमल्हार सेना**

## यंदा घारापुरी (एलिफंटा) येथील महाशिवरात्री उत्सव रद्द

**दै.रायगड नगरी । उरण**

दरवर्षी महाशिवरात्री उत्स-वाला येणाऱ्या भाविकांची गर्दी पाहता तसेच वाढत्या कोरोना विषाणूचा धोका लक्षात घेता भाविकांची घारापुरी (एलिफंटा ) बेटावर मोठ्या प्रमाणात गर्दी होऊ नये या साठी खबरदारी म्हणून गुरुवार (दि. ११ )मार्च रोजी महाशिवरात्री उत्सव रद्द करण्यात आला आहे.

जेएनपीटी येथून होणारी बोट सेवा, उरण (मोरा )ते घारापुरी बोट सेवा, न्हावा ते एलिफंटा, उलवा ते एलिफंटा बोट सेवा येथून महाशिवरात्री निमित्ताने तात्पुरती करण्यात येणारी बोट सेवा ह्या वर्षी कोविड -१९ च्या संभाव्य धोक्यामुळे पूर्णपणे बंद करण्यात आलेली आहे. याची नोंद भाविकांनी घ्यावी. तसेच वरील सर्व ठिकाणाहून बोटीस मेरी टाइम बोर्ड, पोलीस, यांच्या कडून पूर्णपणे बंदी करण्यात आली आहे. तरी भाविकांनी या ठिकाणाहुन येऊ नये असे आदेश उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी काढले आहे व संबंधित अधिकाऱ्यांना लेखी कळविले आहे.

## प्राथमिक शाळेला एक लाखाचा निधी ; डॉ.राजेश पाचारकर यांच्या प्रयत्नाला यश

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्लीपंचतन येथील प्राथमिक शाळेची पाण्याची समस्या सोडवण्याचे काम डॉ. पचारकर यांनी केले.

गेली अनेक वर्षे स्वतःची पाण्याची व्यवस्था नसल्याने शाळेला पाण्याची कमतरता भासत होती. ही गंभीर बाब बोर्लीपंचतन येथील सेवाभावी व्यक्तिमत्व डॉ.राजेश पाचारकर यांना समजताच त्यांनी ओ एन जी सी या कंपनीचे अधिकारी जागेशकुमार सोमकुंवर व विजय पवार यांच्याकडे याबाबत चर्चा केली व त्यांच्याकडुन सकारात्मक प्रतिसाद मिळताच शाळेचा प्रस्ताव कंपनीकडे सादर केला. पुढे मंजुरीसाठी त्याचा पाठपुरावा करुन एक लाख रुपये निधी बोर्लीपंचतन रा.जि.प. प्राथमिक मुलांची व मुलींच्या शाळेसाठी मंजुर करुन घेतला आहे. मंजुर झालेल्या निधीमधुन पाचारकर यांच्या उपस्थितीत शाळेमधे बोअरवेलचे काम करण्यात आले. उरलेला निधी बोअरवेलसाठी आवश्यक असणारा पंप व शाळेतील सरस्वती सभागृहाचे सुशोभिकरण त्याचबरोबर शाळेला आवश्यक असणारे साहीत्य खरेदीसाठी वापरला जाणार आहे. बोअरवेलमुळे शाळेची व बाजूच्या अंगणवाडीची सुध्दा पाण्याची समस्या सुटल्याने दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांनी ओ एन जी सी कंपनी व डॉ.राजेश पाचारकर यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.

मे.मुजावर साहेब

अ‍ॅड.प्रदीप तु. मुंडकर
अर्जदारतर्फे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.२८०/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.२९/४/२०२१

१) श्री.संदेश पांडुरंग केणी
वय वर्षे ४३, धंदा : नोकरी
२) श्री.शितल पांडुरंग केणी
वय वर्षे ३७, धंदा : नोकरी
३) श्रीमती.लिलाबाई पांडुरंग केणी
वय वर्षे ६०, धंदा : घरकाम
अ.क्रं.१ ते ३ सर्व रा.मु.चिंचपाडा,
ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.जयश्री सुधीर मढवी
वय वर्षे ४२, धंदा : घरकाम
रा.रुम नं.१, सिद्धीविनायक चाळ,
साईनाथ नगर, लुईसवाडी, ठाणे पश्चिम,
तालुका, जिल्हा : ठाणे — अर्जदार

१) अर्जदार क्रं.१ ते २ हे कै.पांडुरंग गोमा पाटील उर्फ केणी यांचे मुलगे असून अर्जदार क्रं.३ ही पत्नी आहे. तसेच अर्जदार क्रं.४ ही मुलगी आहे.

२) कै.पांडुरंग गोमा पाटील उर्फ केणी दि.०८/०८/२०२० रोजी वॉखार्ड हॉस्पिटल, मुंबई येथे मयत झाले आहेत. कै.पांडुरंग गोमा पाटील उर्फ केणी यांची आई कै.महादीबाई गोमा पाटील उर्फ केणी यांचे दि.०९/१०/२०१५ रोजी मृत्यू झालेला आहे. अर्जदार हे कायदेशीर वारसदार आहेत. या अर्जदारां व्यतिरिक्त कै.पांडुरंग गोमा पाटील उर्फ केणी यांस आणखीन कोणीही वारसदार नव्हते व नाहीत.

३) कै.पांडुरंग गोमा पाटील उर्फ केणी व इतर यांची मौजे वडघर (चिंचपाडा), ता.पनवेल, जि.रायगड येथील नावे असलेली खालील वर्णनाची संपादीत शेतजमीन व घर मिळकत होती.

**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|
| वडघर | ४ | ४+५ अ | ०-१४-९ | ३६ |
| | ११ | अ | ०-९-६ | |
| | ११ | ब | ०-२८-३ | |
| वडघर | १०८ | ३ | ०-६३-७ | ३७ |
| | ११४ | २ | ०-२५-० | |
| वडघर | ११८ | १ | ०-५७-४ | १३६ |
| | १२२ | ३ | ०-१६-७ | |
| | १२३ | २ | ०-४०-२ | |
| वडघर | १६० | २ | ०-२०-० | ३६ |
| वडघर | १६० | ३ | ०-४४-६ | ३६ |
| वडघर | १६० | ७ | ०-८५-५ | १८ |

तसेच वरील नमूद युनिट केस क्रं.३७ मधील संपादीत शेतजमिनीच्या भूखंडाबाबत कै.पांडुरंग गोमा पाटील यांचे नावे असलेले सदनिका व गाळे सिडको करंजाडे नोड, भूखंड क्रमांक १३, सेक्टर २ ए, आर.एन.एव्हेन्यू बिल्डींग, वडघर, ता.पनवेल, जि.रायगड

| अ. क्रं. | सदनिका/गाळे धारकाचे नाव | सदनिका क्रं./ गाळा क्रं. | कारपेट एरिया (चौ.मी.) | रजि द. क्रं. पवल २ |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.पांडुरंग गोमा पाटील | १०१ | १९.३९५ | १५४९८/२०१८ |
| २ | श्री.पांडुरंग गोमा पाटील | १०२ | १५.९५२ | १५४९५/२०१८ |
| ३ | श्री.पांडुरंग गोमा पाटील | १०६ | ३७.९९६ | १५४९३/२०१८ |
| ४ | श्री.पांडुरंग गोमा पाटील | ७०४ | २४.१७५ | १५४९६/२०१८ |
| ५ | श्री.पांडुरंग गोमा पाटील व इतर | ०३ | २२.२२१ | १६३०२/२०१८ |
| ६ | श्री.पांडुरंग गोमा पाटील व इतर | ०४ | २०.७०७ | १६३००/२०१८ |

तसेच ग्रुप ग्रामपंचायत वडघर हद्दीतील चिंचपाडा येथील कै. पांडुरंग गोमा पाटील उर्फ केणी व इतर यांचे नावे असलेल्या नमुंआंवि प्रकल्पांतर्गत संपादीत घर त्याचा चिंचपाडा, भू.संपादन निवाडा/ संचिका क्रमांक CHMO-ICIG-184 अशी असून त्याबाबत पुष्पक वडघर नोड, सेक्टर R1, भूखंड क्रं.८, एकूण क्षेत्र ५०० (चौ.मी.) हा अविभक्त भूखंड सिडकोच्या वाटपपत्रानुसार मंजूर करण्यात आलेला आहे.

४) वर कलम ३ मधील नमूद कै.पांडुरंग गोमा पाटील उर्फ केणी व इतर यांची नवी मुंबई प्रकल्पाकरिता सिडकोने शेतजमिनी संपादीत केलेल्या आहेत. तसेच सामाईक घर मिळकत ही नमुंआंविमानतळ प्रकल्पांतर्गत संपादीत केलेली आहे. कै.पांडुरंग गोमा पाटील उर्फ केणी व इतर यांचे संपादीत मिळतीच्या बदल्यात सिडकोच्या १२.५ टक्के योजनेचे भूखंड वाटप करण्यात आलेले आहेत तसेच नमुंआंवि प्रकल्पांतर्गत पुर्नवसन योजनेप्रमाणे भूखंड व आर्थिक लाभ मिळवून घेण्याकरिता अर्जदार यांनी तसा वारस दाखला मिळण्याकरिता दिवाणी चौकशी अर्ज क्रं.२८०/२०२१ पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतींबाबत अर्जदार हे कै. पांडुरंग गोमा पाटील उर्फ केणी यांचे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत तरहकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ९/३/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

# जागतिक महिला दिनांच्या निमित्ताने विविध महिला वर्गांचा सन्मान सोहळा

**दै.रायगड नगरी । खोपोली**



जागतिक महिला दिनांचे औचित्य साधून महिला वर्गांचा सन्मान सोहळाचे आयोजन रायगड जिल्हा परिषद शाळा लाडीवली येथे करण्यात आला. महिला मध्ये अनेक गुण लपलेले असते. घर सांभाळत असतांना राजकीय क्षेत्रामध्ये सुद्धा त्या सक्रिय आहेत.

आज जागतिक महिला दिनांचे औचित्य साधून सर्व महिला वर्ग एकत्र आल्यामुळे त्यांच्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

आज महिला वर्ग पुरुषांच्या खाद्याला खांदा लावून काम करीत आहे. घर सांभाळत असतांना वेळात वेळ काढून विविध घरघुती व्यवसाय ते घरीच करीत आहे. यामुळे दैनंदिन जिवनात अर्थिकची कमतरता भासत नाही. शिवाय त्या स्वताच्या पायावर उभे राहत आहे. तालुक्याच्या ठिकाणी ग्रामीण भागातील महिला वर्ग एकत्र ऐवून बचत गटाची स्थापना करण्यात आल्यामुळे महिला वर्ग सक्षम बनत चालल्या आहेत. यावेळी जमलेल्या महिलावर्गासाठी पाककृती या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर, मालती म्हात्रे, केशर पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## मॉर्निंग वॉक करणाऱ्या तरूणाची चेन खेचून दोघेजण पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मॉर्निंग वॉक करणाऱ्या तरूणाच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून दोन अज्ञात इसम मोटारसायकलीवरून पसार झाल्याची घटना कामोठे वसा-हतीत घडली आहे.

विशाल वगरे (वय-२५, रा.-कामोठे) हा सकाळच्या वेळेस मॉर्निंग वॉक करत असताना से.-३६ परिसरात पायी जात असताना अचानकपणे मोटारसायकलीवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्याच्या गळ्यातील १५ हजारांची सोन्याची चेन खेचून पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार कामोठे पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ग्रामपंचायत सावळे

**ता.पनवेल, जि.रायगड**

### जाहीर सूचना सन २०२०/२१

दै.रायगड नगरी या वृत्तपत्रात दि.३ मार्च २०२१ रोजी सावळे ग्रामपंचायत ग्रामपंचायत हद्दीतील साहित्यांच्या अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा /कोटेशन बद्दल जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यामध्ये निविदा उघडण्याची दि.११/०३/२०२१ अशी प्रसिद्ध करण्यात आली होती. ११/०३/२०२१ रोजी सुट्टी असल्याने त्याऐवजी दि.१२/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदा उघडण्यात येतील, याची नोंद घ्यावी असे या शुद्धीपत्रकाद्वारे जाहीर करण्यात येत आहे.

**सही/- ग्रामसेवक ग्रामपंचायत सावळे, ता.पनवेल,जि.रायगड** — **सही/- सरपंच ग्रामपंचायत सावळे, ता.पनवेल,जि.रायगड**

मा.पाठक सो

अ‍ॅड.प्रशांत म. भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.२४२/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०७/४/२०२१

१) श्री.लक्ष्मण मऱ्या कोळी
वय : ७२ वर्षे, व्यवसाय : शेती
२) श्री.देवेंद्र लक्ष्मण कोळी
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
दोघे रा.मु.कोंबडभुजे, पो.उलवे,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. लक्ष्मी लक्ष्मण कोळी ह्या दि.२९/०८/२०१८ रोजी मु.कोंबडभुजे, पो. उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून अर्जदार क्रं.१ हे कै.लक्ष्मी लक्ष्मण कोळी यांचे पती असून अर्जदार क्रं.२ त्यांचा मुलगा असून कायदेशीर वारसदार आहेत. त्यांचे नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | गावाचे नाव | यु.केस नं. | सर्वेक्षण क्र. | घर क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | गणेशपुरी | GAN-ICOGD-128 | GP-255 | ७८० | ८५.५६ चौ.मी. |

वरील घर मिळकतीचे संपादनाचे मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे भूखंडाचे वाटप केलेले आहे.

| नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | २५ A | ३५१ | २६० चौ.मी. |

येणेप्रमाणे घर मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै.लक्ष्मी लक्ष्मण कोळी यांस संपादीत जमिनीचे मोबदल्यात पुनःर्वसन व पुनःस्थापना योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड त्यांच्या पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार क्रं.१ व २ यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारस दाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.०९/०३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्याया, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्याया, पनवेल

मा.पाठक सो

अर्जदारांतर्फे वकील
अ‍ॅड.प्रशांत म. भोईर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.२३७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०७/४/२०२१

१) श्री.जनार्दन विठ्ठल कोळी
रा.मु.कोंबडभुजे, पो.उलवे,
ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.योगिता राजेंद्र वास्कर
रा.मु.ओवे पेठ, पो.खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.सरिता प्रकाश कोळी
रा.मु.पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
४) सौ.सुवर्णा ज्ञानेश्वर कोळी
रा.मु.दिवाळे गाव, पो.कोंकण भवन,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई, ता.जि.ठाणे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.पांडुरंग उर्फ पांडु हिरा कोळी हे दिनांक ०६/१०/१९८९ रोजी मु.कोंबडभुजे, पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले असून, त्यांची मुलगी कै.मानकूबाई जनार्दन कोळी ह्या दि.२६/०६/२०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार क्रं.१ हे कै.मानकूबाई जनार्दन कोळी यांचे पती असून कै.पांडुरंग उर्फ पांडू हिरा कोळी यांचे जावई आहेत व अर्जदार क्रं.२ ते ४ ह्या कै.मानकूबाई जनार्दन कोळी यांच्या मुली असून कै.पांडुरंग उर्फ पांडू हिरा कोळी यांच्या नाती आहेत व हेच कायदेशीर वारसदार आहेत. त्यांचे नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | गावाचे नाव | यु.केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | तरघर | ७४ | ९८ | ३ | ०-६४-८ |

येणेप्रमाणे मिळकती असून सदरहू मिळकतीच्या अनुषंगाने सिडकोकडून कै.पांडुरंग उर्फ पांडू हिरा कोळी यांस संपादीत जमिनीचे मोबदल्यात १२.५ टक्के योजनेंतर्गत विकसित भूखंड मिळणार आहेत. सदर भूखंड त्यांच्या पश्चात कै.मानकूबाई जनार्दन कोळी यांचे वारसदार म्हणून अर्जदार क्रं.१ ते ४ यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.०९/०३/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल

मा.पाठक सो

अ‍ॅड.सुनिल एन. मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.२७९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१५/४/२०२१

१) श्री.बबन गोपीनाथ जाधव
वय : ७५ वर्षे, धंदा : काहीही नाही
२) श्री.राजेश बबन जाधव
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.निलेश बबन जाधव
वय : ४४ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार नं.१ ते ३
रा.फ्लॅट नंबर-३०१, प्लॉट नं.डी-६९,
श्री कृष्णा पॅराडाईज को.ऑप.हौसिंग सोसायटी,
टॉवर-२, सेक्टर १२, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२१०
४) सौ.शिल्पा मधुसूदन मोरे
लग्नाअगोदरचे नाव : कुमारी शिल्पा बबन जाधव
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.सी-२२, ०:२, निवारा को.ऑप.हौसिंग सोसायटी,
सेक्टर ०३, सानपाडा, नवी मुंबई-४००७०५ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ यांची पत्नी व अर्जदार नं.२ ते ४ यांची आई कै. मिनल बबन जाधव यांच्या नावाने मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. अर्जदार नं.१ यांची पत्नी व अर्जदार नं.२ ते ४ यांची आई कै.मिनल बबन जाधव या तारीख १२/१०/२०१८ रोजी अपोलो हॉस्पिटल इंटरप्राईस लिमिटेड, प्लॉट नं.१३, सेक्टर २३, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथील हॉस्पिटलमध्ये मयत झालेले आहेत. कै.मिनल बबन जाधव यांच्या नावाने सिडको कार्यक्षेत्रात खालील वर्णनाची मिळकत सिडकोकडे तसेच महानगरपालिकेकडे नोंदीत आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन (I)**
**मौजे : कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड १२.५ येथील सिडको हद्दीतील शॉप नं.०१, तळमजला, प्लॉट नं.१२, सेक्टर नं.०५, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

**मिळकतीचे वर्णन (II)**
**मौजे : कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड या हद्दीतील सदनिका नं.२५०४, पंचवीसावा मजला, एस-३, 'सी' विंग वेगा, ब्लॉक नं.मॅरेथॉन नेक्सझोन-वेगा, पळस्पे फाट्याजवळ रोड-एन एच हायवे, कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड**

**मिळकतीचे वर्णन (III)**
**मौजे : मुलुंड मुंबई महानगरपालिका हद्दीतील सदनिका क्रमांक १६०२, सोळावा मजला, रुपजी सिग्णीचर, अली बहाद्दूर चाळ, सिमेंट फॅक्टरी रोड, मुलुंड पश्चिम मुंबई-४०००८०**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.०९/०३/२०२१ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — (कोर्टाचा शिक्का) — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## कृषी विभाग व आत्मामार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

संचालक, आत्मा, पुणे कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार काल (दि. ८ मार्च रोजी) जागतिक महिला दिनानिमित्ताने जिल्ह्यात कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणे (आत्मा) मार्फत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

खालापूर, पनवेल, कर्जत, उरण, मुरूड, तळा, रोहा, पाली, पोलादपूर या तालुक्यांमध्ये प्रामुख्याने महिला शेतकऱ्यांचे नागली पिक मूल्यवर्धनाचे प्रशिक्षण आयोजन करण्यात आले होते. फेब्रुवारी २०२१ मध्ये दापोली येथे नागली मूल्यवर्धन प्रशिक्षणामध्ये सहभाग घेतलेल्या महिला शेतकऱ्यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले.

अलिबाग तालुक्यात हिराकोट तलावाजवळ भरविण्यात आलेल्या संत शिरोमणी सावतामाळी रयत बाजाराचे जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. रयत बाजारामध्ये २५ महिला शेतकऱ्यांनी त्यांचा उत्पादित शेतमाल विक्री केला.

रोहा तालुक्यात नागली मूल्यवर्धन प्रशिक्षणासह विकेल ते पिकेल अभियानांतर्गत महिला शेतकऱ्यांना शेतमाल विक्रीसाठी आवश्यक विक्री साहित्याचे वितरण करण्यात आले. पोलादपूर तालुक्यामध्ये नाचणी प्रशिक्षणासह आयोजित करण्यात आलेल्या आरोग्य शिबिरात ३५ महिला शेतकऱ्यांचा उल्लेखनीय सहभाग होता. प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये कृषी व संलग्न विभागाच्या योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये ३५६ महिला शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीम. उज्वला बाणखेले यांनी दिली आहे.



# नदीकिनारी घाणकचरा तुफान, माझी नदी माझी जबाबदारीचा लोकांना पडलाय विसर

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

काळनदी ही माणगांवकरांची जीवनदायिनी म्हणुनच नदीच्या तिरावरील माणगांवशहर झपाट्याने विकसीत होत गेले. ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायत मध्ये झाले आहे. नगरपंचायतीचा विकास झाला पण याच काळनदीचा किनारा आणि आपली जबाबदारी मात्र कोणीही पार पाडीत नाही ! अस दुर्दैवाने म्हणावे लागत आहे. नदीच्या सौंदर्यीकरनाचे जाऊद्यात पण आहे ते नैसर्गिक सौंदर्य आणि जलस्त्रोताचे रक्षण करण्यासाठी आतापासूनच सर्वांनाच पुढे यावे लागेल. यासाठी माझी जीवनदायिनी काळनदी ही माझी जबाबदारी अस समजुन किनाऱ्याची साफसफाई करणे साठी एकजुटीने प्रयत्न करणे हे माणगांवकरांचे आद्य कर्तव्य आहे. अशा प्रकारची भावना सध्या याच किनारी तुफान प्लॅस्टीक कचरा तसेच मद्याच्या काच बाटल्यांचा खच पाहायला मिळत असल्याने काही जाणकारांनी नगरपंचायत निवडणुकीच्या तोंडावर बोलुन व्यक्त केली आहे.



हे वास्तव चित्र आपण काही दिवसांपूर्वीच नदी किनारी बांधलेल्या विसर्जन घाटांवर फेरफटका मारल्यास सहज पाहु शकतो. याबाबत वन्यजीव अभ्यासक पर्यावरण प्रेमी शंतनु कुवेसकर यांनी काळनदीतील पाणी हे अजुनतरी शुध्द असल्याचे सांगत येथे वावरणारी पाणमांजर यांची अभ्यासपूर्ण माहीती संकलीत करण्यासाठी ते नदी किनारी गेले असता, हे विदारक प्लॅस्टीक कचऱ्याचे दृष्य पाहुन वेळीच हा किनारा साफसफाई केला नाही तर, प्रदूषणाने या जलचरांनाच नाही तर आपल्या माणगांवकरांनाही फार मोठे नुकसान सोसावे लागेल, अशी खंत व्यक्त केली आहे.

आपण माणगांवकर रोज सकाळी या नदी जवळून मॉर्निंग वॉकला जातो, सकाळची शुध्द हवा आणि नदीचे सुंदर विस्तीर्ण पात्र बघुन किनारा न्याहाळतो, तेंव्हा एक वेगळेच विनामुल्य मानसिक समाधान मिळते. नदीचे हेच सौंदर्य अबाधित ठेवणे ही आपली जबाबदारी आहे. नगरपंचायतीनेही हा किनारा संरक्षित क्षेत्र म्हणुन याची काळजी घेण्यासाठी या ठिकाणी जनजागृतीपर फलक लावून नदीकिनारी घाण-कचरा करणाऱ्या प्रवृत्तीना आळा घालण्यासाठी योग्य ती खबरदारी घेणे गरजेचे आहे.

वर्षातून किमान एक-दोनदा तरी नदीकिनारी साफसफाई मोहीम राबविणे आपली जबाबदारी आहे. नंतर नर्मदा, कावेरी, कुंडलिका, सिंधू , गंगा या नद्यां प्रमाणे काळनदी बचाव करण्यासाठी शासनाचा पर्यायाने आपलाच निधी खर्ची टाकुन काय फायदा ? अस बोलल जात आहे. मात्र असलेल्या जीवनदायिनीचे प्रदूषण, खराबी होताना उघड्या डोळ्यांनी बघायचे आणि नंतर धावायचे याला म्हणावे तरी काय ? असा सवाल ऐरणीवर आलाय.


## पाहिजेत

**ठाणे येथील ट्रस्ट/निखिल माखेचा यांचे कार्यालयात कामकाजासाठी पुरुष उमेदवाराची आवश्यकता आहे. उमेदवाराला सरकारी व निमसरकारी, न्यायालयीन कामकाज, सिडको अशा कार्यालयातील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य राहील.**

**उमेदवार पनवेल, नवी मुंबई येथे राहणारा असावा व मराठी अवगत असावे. योग्य उमेदवारास वेतन दिले जाईल.**

**संपर्क :**
**१४७, द्वारकादास रतनशी मेन्शन, कलेक्टर ऑफिस जवळ, स्टेशन रोड, ठाणे, पश्चिम**

**संपर्क क्र : ०२२-२५३४१९२९, ९१६७६७९९९०**


## १५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आदिवासी बांधवांना धान्याचे वाटप

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना उरण यांच्या माध्यमातून चिरनेर येथील माकड डोरा आदिवासीवाडी वरील १५ कुटूंबियांना मंगळवार दि ९ मार्च रोजी अन्न धान्यवाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी उपस्थित मनसे नाविकसेना राज्य उपाध्यक्ष संदेशभाई ठाकूर, मनसे उरण उप तालुकाध्यक्ष सत्यवान भगत, राकेश भोईर, दिपक पाटील विभाग अध्यक्ष मनसे, रितेश पाटील जिल्हा उपाध्यक्ष रोजगार स्वयंरोजगार मनसे , हितेश वाहतूक संघटक , बबन ठाकूर आणि महाराष्ट्र सैनिक तसेच आदिवासी बांधव उपस्थित.

## तालुका पोलीस ठाणे अंतर्गत वाकडी येथे निवारा केंद्राचे उद्‌घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलीस ठाणे अंतर्गत, वाकडी येथे निवारा केंद्राचे उद्घाटन पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्या हस्ते ८ मार्च रोजी महिला दिनानिमित्त करण्यात आले. यावेळी पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील महिला पोलीस पाटील, वाकडी ग्रामपंचायत महिला सरपंच आणि महिला सदस्यांचा सत्कार करण्यात आला. तालुका पोलीस ठाण्यातील महिला पोलीस अंमलदार आणि निसर्गप्रेमी रेस्क्यू टीम यांनी केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन भोसले पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर, पोलीस निरीक्षक अंकुश खेडकर यांच्यासह पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि सरपंच कुंदा पवार, उपसरपंच अरुण पाटिल, रमेश पाटिल, नामदेव जमदाड़े यांच्यासह पोलिस पाटील, ग्रामस्थ उपस्थित होते.

वाकड़ी बिट अंतर्गत पोलीस चौकित जवळपास २५ गावे तसेच १२ ते १३ वाड्या यांचा समावेश होतो. गेल्या कित्येक वर्षापासुन येथे चौकी नसल्याने नागरिकाना तक्रार देण्यास नेरे चौकीत जावे लागत असे. ही बाब पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्या लक्षात येताच त्यानी वाकड़ी येथे चौकी बांधण्यास सांगितले. वाकड़ी येथे यापूर्वी चौकीसाठी प्रयत्न करण्यात आले होते. मात्र पोलीस चौकी झाली नव्हती. वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र दौंडकर यानी पोलिसांसाठी आणि पोलिसांना निवारा गस्त व्हावी यासाठी प्रयत्न केले. यावेळी परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त, शिवराज पाटील यानी आपण आपले स्वास्थ चांगले ठेवले तर कुटुंबाचे स्वस्थ ठेवता येईल. महिलानी आपल्या व्यक्तिमत्वावर लक्ष द्या. स्वतःच्या आणि कुटुंबाच्या आरोग्यावर लक्ष द्या. आणि समाजासाठी काम करत राहा. महिला पोलीसांची कामगिरी वाखाणण्याजोगी असल्याचे सांगितले. पोलीस महिला ह्या कठिण परिस्थितीत काम करत आहेत. या पोलीस महिलाना नागरिकानी सहकार्य करावे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

> समाजातील काही प्रश्न, तक्रारी असतील तर या वाकडी चौकीद्वारे ते सोडविण्याचा प्रयत्न करावा. नागरिकाना पनवेलला जावे लागणार नाही याची पोलिसानी काळजी घ्यावी. सोशल मीडियाचा वापर आपली मुले, मुली कशासाठी करतात याकडे महिलांनी लक्ष देणे गरजेचे असल्याचे सांगितले. महिलानी पोलीस स्टेशनला महिला दक्षता कमिटी आहे, त्याची मदत घ्यावी.
> **- शिवराज पाटील, पोलीस उपायुक्त**

# काँग्रेसचे नगरसेवक शिवाजी शिंदेंचे सदस्यत्व रद्द झाल्याचा फायदा नगरपरिषदेच्या निवडणुकीत शिवसेनेला होणार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

आपल्याच राहत्या घरावर गरजेनुसार केलेल्या अतिरिक्त बांधकाम प्रकरणी नगरसेवक शिवाजी शिंदेंच्या सदस्यत्वावर गंडांतर आले असून जिल्हाधिकारी कार्यालयात याबाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारी अर्जानुसार शिंदेंनी केलेले वाढीव बांधकाम हे अनधिकृत असल्याचे नगरपरिषदेच्या मार्फत सिद्ध झाले होते. त्यामुळे जिल्हाधिकारी रायगड यांनी शिवाजी शिंदेंना अपात्र ठरवून त्यांचे नगरपरिषदेतील सदस्यत्व रद्द केले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,नगरपरिषदेत शिवसेनेची एकहाती सत्ता स्थापन झाली असून त्यावेळी विरोधी पक्षाचे अर्थातच राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन नगरसेविका आणि काँग्रेसचा एकमेव नगरसेवक सन २०१६ च्या निवडणुकीत निवडून आले होते. परंतु नगरपरिषदेच्या कामकाजात सत्तधारी गटाच्या काही त्रुटी निदर्शनास आल्यास ठाम विरोधाची भूमिका घेण्याची जबाबदारी एकट्या शिवाजी शिंदेंनी कुठल्याही प्रकारच्या आमिषाला बळी न पडता इमानेइतबारे निभावली होती. दोन वर्षांपूर्वी नगरपरिषदेच्या सभागृहात सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे एकमेव सदस्य असलेले काँग्रेसचे शिवाजी



शिंदे आणि सत्ताधारी गटातील प्रमुख नेत्यांसोबत शिंदेंची काही विषयावरून शाब्दिक चकमक उडाली होती. त्यावेळेस शिवसेनेचे सक्रीय कार्यकर्ते सिताराम शिंदे यांनी या शाब्दिक बाचाबाची मध्ये हस्तक्षेप केला होता. त्यावेळेस शिवाजी शिंदेंनी त्यास सक्त ताकीद दिली होती की, पक्षाचे दोन वरिष्ठ बोलत असताना तू मध्ये तोंड उघडू नकोस यावरून त्यांच्यात हमरातुमरी झाली होती. याचा राग मनात ठेवून सिताराम शिंदेंनी नगरसेवक शिवाजी शिंदेंच्या अतिरिक्त बांधकामा बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात त्याचे सदस्यत्व रद्द करण्याबाबत सन २०१९ मध्ये तक्रारी अर्ज सादर केला होता. त्यावेळी शिवसेनेच्या प्रमुख नेत्यांनी सिताराम शिंदेंना ही टोकाची भूमिका घेऊ नये म्हणून अनेकदा विनंती केली होती.परंतु त्यास कुठल्याही प्रकारचा सिताराम यांनी दुजोरा दिला नाही. आणि आपल्या निर्णयावर ठाम राहून तक्रारी अर्ज जिल्हाधिकारी यांच्याकडे सुपूर्द केला होता.

जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून दि.३ मार्च २०२१ रोजी अतिरिक्त वाढीव बांधकामा प्रकरणी शिवाजी शिंदेंचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. आपल्या प्रखर वक्तृत्वाने शिवाजी शिंदेंनी सभागृहात विरोधी पक्षाची भूमिका उत्तम प्रकारे पार पाडली होती. काँग्रेस पक्षाचा एक बुलंद आवाज आणि धगधगता ज्वलंत निखारा म्हणून तालुक्यात त्यांच्या नावाची चर्चा होती. माथेरान हे निम्म्याहून अधिक प्रमाणात बांधकामा बाबतीत अनधिकृत असताना याची झळ एकट्या शिवाजी शिंदेंना नगरसेवक या राजकीय पदामुळे सोसावी लागली आहे. त्यांचे सदस्यत्व रद्द झाल्यामुळे सोशल मीडियावर निरनिराळ्या प्रकारच्या चर्चेला उधाण आले आहे. त्यामुळे आगामी नगरपरिषदेच्या डिसेंबर २०२१ च्या निवडणुकी मध्ये शिवाजी शिंदें सारखा लढवय्या विरोधक कदाचित सभागृहात नसणार याचा लाभ शिवसेनेला होणार की अजून काही राजकीय समीकरणे आणि घडामोडी घडणार आहेत याकडे आता समस्त माथेरान करांचे लक्ष लागले आहे.

## रोहा-काकळघर एस.टी.सेवा सुरू करा : ग्रामस्थ व प्रवासीवर्गाची मागणी

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील दुर्गम ग्रामीण भागातील दुवा असलेली रोहा- काकळघर एस.टी.सेवा सुरू करण्यात यावी. अशी मागणी ग्रामस्थ व प्रवासीवर्गातून होत आहे.

कोरोना रोगाच्या पार्श्र्वभूमीवर लॉकडाऊन काळात एस.टी.च्या फे-या बंद करण्यात आल्या होत्या.अनलॉक नंतर जनजीवन सुरळीत होत असताना अनेक फेऱ्या सुरू करण्यात आल्या मात्र दुर्गम ग्रामीण भागातील दुवा असलेली ही रोहा-काकळघर एस.टी.अद्याप सुरू करण्यात न आल्याने काकळघर व मांडला पंचक्रोशीतील सकाळच्या वेळेत फळभाजी-पाला व दुध विक्रेते तसेच रोहा, रेवदंडा, अलिबाग व मुरुड कडे ये-जा करणाऱ्या प्रवाशांना पायपीट करून हाल व त्रास सहन करावा लागतो आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकारी वर्गाने यात लक्ष पुरवून रोहा-काकळघर एस. टी.बससेवा सुरू करण्यात यावी. अशी मागणी ग्रामस्थ व प्रवासीवर्गातून होत आहे.

## कामोठे वसाहतीमध्ये प्रतिबंधित तंबाखू व सुगंधी पान मसाल्याची विक्री करणाऱ्याविरूद्ध धडक कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात पान टपरी व इतर दुकानांमध्ये बेकायदेशीररित्या प्रतिबंधित तंबाखू व सुगंधी पान मसाल्याची विक्री करण्यात येत होती. यांच्या विरोधात अन्न व औषध प्रशासनाने तसेच कामोठे पोलिस ठाण्याने धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात विक्रीस बंदी असलेला माल हस्तगत केला आहे.

महाराष्ट्रात प्रतिबंधित तंबाखू व सुगंधी पान मसाल्याची विक्री करण्यास बंदी असतानाही छुप्या मार्गाने सदर माल इतर राज्यातून आणून कामोठे वसाहतीत अनेक पान टपरी व इतर दुकानांमध्ये त्याची सर्रास विक्री केली जात होती. याबाबतच्या अनेक तक्रारी स्थानिक रहिवाशांनी अन्न व औषध प्रशासनाकडे केल्यानंतर कामोठे पोलिस ठाण्याच्या वपोनि स्मिता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने वसाहतीमधील वेगवेगळ्या दुकानांवर धडक कारवाई करून जवळपास ५७, ७५, ५० रू. किंमतीचा माल हस्तगत करून त्यांच्याविरूद्ध कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईमुळे अशा प्रकारे बेकायदेशीररित्या छुप्या मार्गाने विक्री करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत.

## पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

कार्यालय जा.क्र.पमपा/करपट्टी ७/७८६/२०२१ — दिनांक : ०९/०३/२०२१

**(वाचा : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावात बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून, त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्रं. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ११ | फा.प्लॉट नं.५०/३४, सदनिका क्र.०२ निल आकाश, परदेशी आळी, पनवेल | संदीप कुलकर्णी | अपर्णा सुधीर नाडगौंडी सुधीर आनंद नाडगौंडी |
| २ | ८ | फा.प्लॉट नं.२७४, गाळा क्र.१ श्री.पंचमुखी मारुती संकुल, पनवेल | दिनेश हरदेवप्रसाद गुप्ता | प्रभा अशोक शाह (गडा), मेहुल अशोक गडा, महेक अशोक गडा |
| ३ | १ | सिटी सर्व्हे क्रमांक ३४५, पनवेल सदनिका क्र.३०४, बाळूमियाँ रेसिडेन्सी | फिरोज रजबअली व इतर मे.महिदा कंस्ट्रक्शन | समीना आदील पंगले |
| ४ | ५ | सिटी सर्व्हे क्र.७४६ए, ए/१, बी, बी/१, सी, सी/१, डी,ई,७४६/२, सदनिका क्र.६, समर्थ निवास, पनवेल | विजय रघुनाथ जोशी | विक्रांत विजय जोशी |
| ५ | १० | प्रॉपर्टी क्र.१३४३/४४/४५/५२, पनवेल सदनिका क्र.१०५, नित्यानंद कृपा | वामन रामचंद्र देवधर | ज्योत्स्ना सुरेंद्र राजोपाध्ये |
| ६ | १० | प्रॉपर्टी क्र.१३४३/४४/४५/५२, पनवेल गाळा क्र.५, नित्यानंद कृपा | वामन रामचंद्र देवधर | ज्योत्स्ना सुरेंद्र राजोपाध्ये |
| ७ | | प्रॉपर्टी क्रमांक १३६७/ए १, पनवेल गाळा क्र.०२, उषा प्रभा सोसायटी | उषा प्रभा सोसायटी श्री समर्थ कृपा डेव्हलपर्स | सैफीउल्लाह जलील अन्सारी नसिबून निशा अन्सारी |
| ८ | ७ | सिटी सर्व्हे क्र.४२०, सदनिका क्र.२०१ मैमुना अपार्टमेंट, पनवेल | भोगवटदार हसन इब्राहीम ढेपे | भोगवटदार मोहम्मद तारहक हसन ढेपे |
| ९ | १४ | सर्व्हे क्रमांक ४८३/४८४, सदनिका क्र.६३ डी विंग, बि.नं.१, साईनगर, पनवेल | मे.सुपर कंन्स्ट्रक्शन कंपनी | ए.आर.हेगडे |
| १० | | धानसर १३६५ | मे.सर्वेश कंस्ट्र बिल्डर्स तर्फे प्रोप्रा. विजय राम उलवेकर | शिवाजी रंगराव भिसे निता शिवाजी भिसे |
| ११ | | रोहिंजण १२६४ (९) | अब्दुल हमीद शेख | सादीक हमीद शेख |
| १२ | | रोहिंजण ५६५ (अ) १३ | प्रथमेश पुरुषोत्तम सप्रे | सुवर्णा बैजुनाथ पाटील |
| १३ | | रोहिंजण ५६४ (३) | केतन दिनकर खेऊर | बहाद्दूर सिंघ, छैल कँवर |
| १४ | | रोहिंजण १७०९ | मो.इब्राहीम मो.रजा खान | मो.आसीफ मो.शरिफ कुरेशी |
| १५ | | रोहिंजण ८७० | अमीर बादशाह शेख | समि.उल्लाह बदलू खान शबनम समीउल्लाह खान |
| १६ | | नावडे जी-७ | अजिंक्य केमिकल | एल.बी.स्पेशिअलिटीज प्रा.लि. |
| १७ | | पडघे ३२७/अ | प्रकाश भाऊ विश्वासराव | सोनाली मनजीत मोरे |
| १८ | | घोट/चाळ ०९ | वासुदेव शिवराम प्रधान | वैभव वासुदेव प्रधान |
| १९ | | पालेखुर्द ४९३/२३ | मुश्ताक इस्लात मन्सुरी/आधार हौ.फायनान्स लि.तर्फे चित्तरंजन रघमराम पुजारी | वैशाली परशुराम पवार |
| २० | | पालेखुर्द ९०१ | रमेश सन ऑफ जगदीश उर्फ रमेश जगदीश सध्येसिया | एम डी शरिफ सन ऑफ अब्दुल कच्चूम |
| २१ | | पालेखुर्द ९३/ए-२०१ | मे.मुनलाईट बिल्डर आणि डेव्ह.तर्फे भागी.इब्राहीम बरकतुल्ला खान | बबन रामचंद्र शिर्के |
| २२ | | पालेखुर्द ९३/ए-१०२ | मे.मुनलाईट बिल्डर आणि डेव्ह.तर्फे भागी.इब्राहीम बरकतुल्ला खान | बबन रामचंद्र शिर्के |
| २३ | ४ | फा.प्लॉट नं.२०५/१५, सदनिका क्र.२०२ कनिक विश्वप्रभा, एमसीसीएच सोसायटी, पनवेल | मानस निलमकुमार तुंगारे | आरती निलमकुमार तुंगारे |
| २४ | १३ | फा.प्लॉट नं.३०३/२, सदनिका क्र.४०१ जेसल मेलडी, तक्का, पनवेल | राजू पांडुरंग म्हात्रे | प्रथमेश सुभाष मोकल अमृता प्रथमेश मोकल |
| २५ | १३ | फा.प्लॉट नं.३११, ३६६ ते ३७०, पनवेल सदनिका क्र.८०५, बालाजी आंगण | शिल्पा रत्नाकर देशपांडे | जयंत पांडुरंग भगत, सौरभ जयंत भगत, नयना सौरभ भगत |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असेलस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहा.आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**